*।। ज्योतिषवार्ता ।।*

## राष्ट्रीय भविष्य वर्तवितांना सामाजिक भान महत्त्वाचे

**- मा. उदयराज साने**

ठाणे : फलज्योतिष अभ्यास मंडळ, पुणे सुवर्ण महोत्सव अभियान अंतर्गत व्याख्यानमालेत 'मेदिनिय ज्योतिष' या विषयावर बोलताना प्रमुख व्याख्याते मा. उदयराज साने यांनी 'राष्ट्रीय भविष्य वर्तवितांना सामाजिक बंधन पाळावे' असे उद्गार काढले. आपल्या भाषणात जातकाची वैयक्तिक कुंडली व देशाची कुंडली याचे भविष्य वर्तविताना ग्रहांचे तुलनात्मक तर्कशास्त्र कसे लावावे याचे सोदाहरण देऊन स्पष्टीकरण केले. आपल्या प्रतिपादनात हे भूमध्याचे ज्योतिष असून शुक्र-नेपच्यूनच्या अशुभ योगात समाज स्त्रैण स्वरुपाचा होण्याची शक्यता असते तर मंगळ-गुरु प्रतियोगात पेपरफुटी, धार्मिक लढाया, परीक्षा रद्द होणे यांसारख्या घटना घडू शकतात. यावेळी व्यासपीठावर दुसरे व्याख्याते पुण्याचे मा. शरदचंद्र गोखले, अध्यक्ष पं. विजय जकातदार व संस्थेच्या ठाण्याच्या संचालिका सौ. भारती घाटपांडे उपस्थित होत्या.

सुरुवातीला सौ. आरती घाटपांडे यांनी दोन्ही वक्त्यांचा परिचय व स्वागत केले. त्यानंतर शरदचंद्र गोखले यांनी आपल्या भाषणात अतिशय तर्कशुद्ध पद्धतीने व सोप्या भाषेत प्रत्येक लग्नाचा योगकारक ग्रह कसा काढावा याचे सुंदर विवेचन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात पं. विजय जकातदार यांनी दोन्ही वक्त्यांनी मांडलेल्या मुद्यांचा विचार बरोबर असून राष्ट्रीय भविष्य वर्तविताना राष्ट्राच्या कुंडलीबरोबरच राष्ट्राच्या हित-अहितात नेत्यांच्या बुद्धीचा परिणाम होत असल्यामुळे नेत्यांच्या कुंडलीचाही विचार महत्त्वाचा आहे असे सांगितले. त्यानंतर वक्त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन समाधान केले. आभारप्रदर्शन श्री. मनोज जोशी व पसायदान सौ. माधुरी दीक्षित यांनी म्हटल्यानंतर समारंभाची सांगता झाली.

या समारंभास ठाण्याचे ज्येष्ठ कृष्णमूर्ती विशारद सर्वश्री मा. सुनील गोंधळेकर, व्यंकटेश कदम, सुहास सावरगांवकर, मधुकर लेले, श्री. कुंटे हे ज्योतिर्विद व ज्योतिष अभ्यासक हजर होते. समारंभ यशस्वी होण्यासाठी श्री. विरेंद्र पेठे, सौ. स्मिता नायर, गौरी मुळे, केदार सोमण, मानसी साठ्ये, सायली खण्डपूर, स्नेहल अभ्यंकर, इ. कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## अभिनंदन !

के.पी. ॲस्ट्रॉलॉजर इंटरनॅशनल समिट हैद्राबाद, आंध्रप्रदेश (भारत) दिनांक १४, १५ जुलै २००७ ला मान्यवर श्री. सुनील गोंधळेकर ह्यांचे फोर स्टेप थिअरीवर समिटच्या उद्घाटन प्रसंगी सर्वप्रथम भाषण व मार्गदर्शनाची संधी (भारतातील व विदेशातील ज्योतिष विद्वानांसमोर प्रथम भाषणात) मिळाल्याबद्दल मी त्यांचे मनस्वी, हार्दिक अभिनंदन करतो. त्याचबरोबर संपादक, नक्षत्राचं देणं ह्यांना विनंती करतो की, तेथील भाषण, मार्गदर्शनाचा काही उल्लेखनीय भाग आगामी मासिक 'नक्षत्राचं देणं' ह्यात प्रकाशित करून अनुग्रहीत करावा. पुनश्च एकदा हार्दिक अभिनंदन !

**- हेमंत लोंढे**

## आमदार श्री. संजय केळकर ह्यांना पितृशोक

आमचे वर्गणीदार व हितचिंतक मा. आमदार श्री. संजय केळकर यांचे वडील श्री. मुकुंद केळकर, वय वर्षे ८१ ह्यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. 'नक्षत्राचं देणं' परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

संपादक, नक्षत्राचं देणं



वासुदेव पांडे चंद्रपूर
09422138601
12/09/07 10·30 AM
लेख अप्रतीम असल्याबद्दल फोन.



# हरवलेली वस्तू सापडेल की नाही ?

**श्री. सुभाष एकतारे**, ज्योतिष विशारद, नक्षत्रशिरोमणी
५८/७०४, वसंत औदुंबर को.ऑप. सोसा., वसंतविहार, ठाणे-४०० ६१०. फोन : ०९३२४३४६२४८

अगदी अलिकडची म्हणजे १३ जून २००७ ची गोष्ट आहे. रात्रीचे जेवण करून टी.व्ही. पाहत बसलो होतो आणि अचानक लाईट गेले. झोपही येत नव्हती. काहीतरी विचार करत अंथरुणावर पडलो होतो. तेवढ्यात फोनची बेल वाजली.

'हॅलो बाबा, कसे आहात ? काय करत आहात ?' माझ्या मुलीचा दिल्लीवरून फोन होता. थोड्याफार इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. पण आज तिच्या आवाजावरून ती उदास व काळजीत असल्याचे मला जाणवले.

'सगळं काही ठीक आहे ना ?' मी सरळ तिला विचारले. प्रथम 'काही नाही, ठीक आहे' म्हणाली. पण परत खोदून विचारल्यावर तिने सांगितले की, दोन-तीन दिवसांपासून माझे मंगळसूत्र कुठे दिसत नाही. सर्व घर शोधले पण व्यर्थ. कुठे ठेवले काहीच आठवत नाही.

'अग घरातच असेल नीट ठेवलेलं. होतं असं कधीकधी. शांपणे विचार कर मग आठवेल.' तिला दिलासा देण्याच्या उद्देशाने मी म्हटले, पण ते 'घरातच आहे का चोरीला गेलं' हे कृष्णमूर्ती पद्धतीने पहायला काय हरकत आहे असा मनात विचार आला. अन लगेच तिला सांगितले की, १ ते २४९ मधील एक नंबर सांग. मी प्रश्नकुंडली मांडून तुला उद्या फोन करतो. कारण आता येथे लाईटही नाहीत. तिने पटकन ४९ नंबर दिला.

दुसऱ्या दिवशी म्हणजे १४-६-२००७ ला ठाणे येथे दुपारी १.४९ .९ वा. प्रश्न सोडवायला घेतला. सदर प्रश्नकुंडली (डॉ. कारेकरांच्या प्रोग्रॅमप्रमाणे) खाली दिली आहे. कुंडलीचा सखोल अभ्यास करून लगेच तिला फोन लावला व सांगितले की मंगळसूत्र घरातच आहे, चोरीला गेले नाही आणि ते लवकरच म्हणजे १७ जूनला सापडेल. अगदी निश्चिंत रहा. हो आणि सापडल्याबरोबर मला फोन कर.

बरोबर १७ तारखेस सकाळी १० चे सुमारास फोन खणखणला. मी वाट पहातच होतो. फोन मुलीचाच होता. 'बाबा अगदी तुम्ही सांगितल्याप्रमाणे आजच सकाळी म्हणजे आत्ताच मंगळसूत्र सापडले. डायनिंग टेबलाच्या खुर्चीच्या कोपऱ्यात अडकले होते.' झालं दोघांचा जीव भांड्यात पडला.

आता प्रश्नकुंडलीच्या विश्लेषणातून या निर्णयाप्रत कसा पोहोचलो ते सविस्तर पाहू. मौल्यवान वस्तू द्वितीय स्थानावरून पाहिली जाते. के.पी. प्रमाणे जर ११ व्या भावाचा सब द्वितीय भावाचा बलवान कार्येश असेल तर हरवलेली (किंवा चोरीला गेलेली) वस्तू सापडते व त्या भावाच्या कार्येशांच्या संयुक्त दशेमध्ये सापडते. हा झाला के.पी. चा नियम.

या कुंडलीत ११ चा सब राहू असून त्याच्या चौपदरी कार्येशत्वानुसार १, २ व ४ या तीनही पायऱ्यांवर तो द्वितीय भावाचा बलवान कार्येश

'निरयन भावचलित कुंडली'

| भाव | न. स्वा. | उप. स्वा. |
|---|---|---|
| ०१ | रा. | श. |
| ०२ | श. | श. |
| ०३ | के. | शु. |
| ०४ | र. | गु. |
| ०५ | मं. | चं. |
| ०६ | श. | शु. |
| ०७ | के. | श. |
| ०८ | र. | श. |
| ०९ | मं. | बु. |
| १० | गु. | रा. |
| ११ | के. | रा. |
| १२ | र. | शु. |




| ग्रह | न. स्वा. | उप. स्वा. |
|---|---|---|
| र. | मं. | श. |
| चं. | चं. | बु. |
| मं. | बु. | श. |
| बु. | रा. | र. |
| गु(व) | बु. | शु. |
| शु. | श. | रा. |
| श. | बु. | गु. |
| रा. | रा. | शु. |
| के. | शु. | चं. |

नक्षत्रात ग्रह नाहीत – रवि, गुरु, केतू. स्वनक्षत्रात – चंद्र, राहू.
प्रश्नसमयी चंद्र महादशा १०-३-२११, बुध अंतरदशा १६ जून ०८, शुक्र विदशा २५-७-०७ पर्यंत

●● केतू ३ र. १२
न.स्वा.शु. २, ५
सब चं. १२ गु. ६, ७
सब न.स्वा. चं.१२ गु. ६, ७

शुक्र –
न.स्वा.श. २, ८
सब रा. ९ श. २, ८
सब न.स्वा. रा. ९ श. २, ८

●● रवि १२
न.स्वा. मं. १०,११
सब श. –
सब न.स्वा. बु. १, ४

●● चंद्र १२ गु. ६, ७
न.स्वा. चं. १२ गु. ६, ७
सब बुध –
सब न.स्वा.रा. ९ श. २, ८

मंगळ –
न.स्वा. बु. १, ४
सब श. –
सब न.स्वा. बु.१, ४

●● राहू ९ श. २, ८
न.स्वा.रा. ९ श. २, ८
सब शु. –
सब न.स्वा.श. २, ८

●● गुरु ६, ७ चं.१२
न.स्वा. बु. १, ४
सब शु.–
सब न.स्वा. श. २, ८

शनि –
न.स्वा. बु. १, ४
सब गु.६, ७ चं. १२
सब न.स्वा. बु. १, ४

बुध –
न.स्वा.रा. ९ श. २, ८
सब र. १२
सब न.स्वा. मं. १०, ११





आहे. म्हणजे हरवलेली वस्तू नक्की सापडेल. दुसरे म्हणजे राहू कुंभ राशीत असल्यामुळे शनीचा रिप्रेझेंटेटिव्ह झाला आणि शनि दुसऱ्या व चौथ्या पायरीवर १ व ४ या भावांचा बलवान कार्येश आहे. चतुर्थ भावाची उपस्थिती हरवलेली वस्तू घरातच असल्याचे सुचवते.

कालनिर्णयासाठी आपण संयुक्त दशांचा विचार करू. तत्पूर्वी प्रश्नवेळचे रुलिंग प्लॅनेट कोणते ते पाहू. प्रश्नसमयी कन्या लग्न १९.३९.४४ होते. म्हणजे लग्नस्वामी बुध व लग्न नक्षत्रस्वामी चंद्र होता. आणि चंद्र वृषभेत १८.२०.३४ म्हणजे राशीस्वामी शुक्र व नक्षत्र-स्वामी चंद्र होता व वार गुरुवार होता. म्हणजे रुलिंग प्लॅनेट असे होते.

LS–चंद्र, L–बुध, S–चंद्र, R–शुक्र, D–गुरु.

प्रश्नवेळी चंद्र महादशा
१८-३-२०११ पर्यंत
चंद्र महादशेत बुध अंतरदशा
१७-१-२००७ ते १६-६-२००८
बुध अंतरदशेत शुक्र विदशा
३०-४-२००७ ते २५-७-२००७
शुक्र विदशेत गुरु सूक्ष्मदशा
१२-६-२००७ ते २४-६-२००७
गुरु सूक्ष्मदशेत शनि प्राणदशा
१५-६-२००७ ते १६-६-२००७
गुरु सूक्ष्मदशेत बुध प्राणदशा
१७-६-२००७

सर्व रुलिंग प्लॅनेट व दशास्वामी हे शीघ्रगती ग्रह असल्यामुळे हरवलेली वस्तू लवकरच सापडेल असा निष्कर्ष काढायला हरकत नाही. दशास्वामी चंद्र २ चा कार्येश. अंतरदशास्वामी बुध २, ११ चा कार्येश (येथे २, ११ ची साखळी पूर्ण झाली.) विदशास्वामी शुक्र २ चा कार्येश, सूक्ष्मदशास्वामी गुरु ३, १ व ४ (वस्तू घरातच असल्याचे सुचवतो) चे कार्येश असल्यामुळे १२-६-०७ ते २४-६-२००७ या कालावधीत वस्तू सापडायला हवी. सूक्ष्म कालावधी काढण्यासाठी प्राणदशा पाहू. गुरु सूक्ष्मदशेत गुरुची प्राणदशा १२-६-०७ ते १४-६-०७ होती. हा कालावधी संपला होता. नंतर येणारी शनि प्राणदशा दोन कारणास्तव प्रतिकूल झाली. १) शनि हा २ व ११ पैकी एकाही भावाचा कार्येश नाही, २) शनि हा विलंबकारक ग्रह असून २ मध्ये स्थित आहे. त्यानंतर येणारी बुधाची प्राणदशा – बुध हा २ व ११ चा बलवान कार्येश असल्यामुळे अनुकूल आहे. त्यामुळे १७-६-२००७ ला मंगळसूत्र घरातच असून नक्की सापडेल असा निर्णय घेतला. शिवाय १७-६-२००७ रोजी सर्व ग्रहांचे गोचरही जुळत होते. योगायोगाची गोष्ट म्हणजे मंगळसूत्र सापडले त्यावेळी कर्क लग्न (स्वामी चंद्र) व लग्न नक्षत्र आश्लेषा (स्वामी बुध) उदित होते.

श्री. गोंधळेकर सरांना वंदन करून हा लेख अर्पण. केवळ त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझा आत्मविश्वास जोपासला व अशा प्रकारे अचूक भविष्य सांगू शकलो.

**ज्योतिष सल्ला**

'नक्षत्राचं देणं' चे संपादक श्री. सुनील गोंधळेकर दर महिन्याच्या पहिल्या शनिवार-रविवारी पुणे येथे सकाळी ११ ते ६ ह्या वेळेत ज्योतिष सल्ला (सशुल्क) देणार आहेत. ॲपॉइंटमेंटसाठी पुणे संपर्क :
रोहिणी बुक डेपो २४४५५८३८.
सदर सल्ला कृष्णमूर्ती ॲडव्हान्स पद्धतीने देण्यात येईल.

प्रश्न तुमचा - उत्तर आमचे

**आपला महत्वाचा एक प्रश्न खाली दिलेल्या ठिकाणी भरून पाठवा व त्याबरोबर १०० रुपयांची मनिऑर्डर खालील नावाने पाठवा.**

**संपादकांकडून के.पी. ॲडव्हान्स पद्धतीने प्रश्नाचे उत्तर पाठविले जाईल.**
**ह्या पानाची झेरॉक्स काढावी.**
**मनिऑर्डर/डी.डी. वर आपला संपूर्ण पत्ता लिहावा.**

प्रश्न : ______________________________

______________________________

१ ते २४९ नंबरपैकी मनात येणारा अंक पाठवणे आवश्यक आहे.

नंबर [ ]

प्रश्नकर्त्याचे नांव : ______________________________

संपूर्ण पत्ता : ______________________________

______________________________

*पत्रव्यवहार :*

**श्री. सुनील गोंधळेकर**
१०९, गोदावरी, लक्ष्मी इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स,
वर्तकनगर, ठाणे-४०० ६०६
फोन : २५८८८१७९





# पाहू रे किती वाट..... बाळा

**श्री. सुभाष एकतारे, ज्योतिष विशारद, नक्षत्रशिरोमणी**
**५८/७०४, वसंत औदुंबर को. ऑप. सोसायटी, वसंत विहार, पोखरण रोड नं. २, ठाणे.**

मी कृष्णमूर्ती पद्धतीचा अभ्यास सुरू करून जेमतेम सात–आठ महिने झाले असतील तेव्हाची म्हणजे जून-जुलै २००३ ची गोष्ट आहे. नागपूरलाच माझे अगदी निकटचे नातेवाईक असतात. त्याचेकडे मी सहजच नेहमीप्रमाणे गेलो होतो. इकडच्या तिकडच्या गप्पा सुरु होत्या. तितक्यात त्यांची मुलगी आली आणि म्हणाली; मला एक प्रश्न विचारायचा आहे. विचारू का ? मी म्हटले विचार. तिचा प्रश्न संततीबद्दल होता. लग्न होऊन ५–६ वर्षे झाली होती. पण संतती नव्हती. त्यांच्याकडे साधी पत्रिका होती. तेव्हा जरुर तो तपशील घेतला आणि सांगितले की, दोनएक दिवसात 'कृष्णमूर्ती पद्धती' ने पत्रिका बनवून उत्तर देतो. बोलण्याबोलण्यात असेही आढळून आले की ती मूल दत्तक घ्यावे की काय याचाही विचार करीत होती. असो.

घरी जाऊन प्रथम कुंडली बनवली. त्यावेळी माझ्याकडे कॉम्प्युटर नसल्यामुळे बरीच आकडेमोड करावी लागली. दोन–तीन दिवसांनी त्यांना सांगितले की संततीयोग निश्चित आहे. पण उशीरा. म्हणजे एप्रिल २००६ ते जून २००६ मध्ये संतती होईल. त्यावेळी 'फोर स्टेप थिअरी' बद्दल काही कल्पना नव्हती. आता प्रचलित 'कृष्णमूर्ती पद्धत' व 'फोर स्टेप थिअरी' चा तुलनात्मक अभ्यास वाचकांसमोर ठेवावा म्हणून हा लेख लिहिण्याचा खटाटोप. त्यासाठी जुनी कागदपत्रे, टाचणे, शोधण्याचा प्रयत्न केला. पण मिळाली नाहीत. सोबत डॉ. कारेकरांच्या प्रोग्रॅमने बनवलेली कुंडली दिली आहे. मी बनवलेल्या कुंडलीत व ह्या कुंडलीत फारसा फरक नसावा. तेव्हा याच कुंडलीवरून मी तौलनिक अभ्यास केला तो वाचकांसमोर मांडत आहे.

प्रथम संततीयोग आहे की नाही ते पाहू. येथे पंचमाचा सब शुक्र आहे. शुक्र लाभस्थानात असून स्वत: पंचमेश आहे आणि पंचमस्थानात इतर कोणताही ग्रह नाही. त्यामुळे संततीयोग नक्की आहे असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

पुढील पायरी कालनिर्णयाची. त्यासाठी प्रथम २, ५ व ११ स्थानांचे निर्देशक ग्रह काढू. ते पुढील कोष्टकात दिले आहेत. तसेच 'फोर स्टेप थिअरी' प्रमाणे प्रत्येक ग्रहाचे चौपदरी कार्येशत्व कुंडलीसोबत दिले आहे.

| भाव | भावस्थित ग्रहांच्या नक्षत्रातील ग्रह | भावस्थित ग्रह | भावेशाच्या नक्षत्रातील | भावेश |
|---|---|---|---|---|
| २ | -- | -- | गुरु शनि केतू | मंगळ |
| ५ | -- | -- | शुक्र | चंद्र |
| ११ | चंद्र मंगळ | गुरु शुक्र | -- | शनि |

प्रश्नसमयी बुध महादशा व बुध अंतरदशा सुरु होती. बुध महादशा १४ मार्च २०१९ पर्यंत असून त्यातील बुध अंतरदशा १० ऑगस्ट २००४ पर्यंत होती.

वरवर पाहता वरील कार्येशामध्ये बुध कोठेही दिसत नाही. परंतु केतू द्वितीय स्थानाचा